राज्यातील दुष्काळ (Trigger-१) आणि (Trigger-२) जाहीर झालेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यांतील लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०२६/प्र.क्र.५०/ना.पु.२२,**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २२ ऑक्टोबर, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग, क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/ मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६.
२)शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र. अधापु-२०२६/प्र.क्र.५०/ना.पु.२२, दि. ०९ ऑक्टोबर, २०२६.
२) शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग, क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४ ऑक्टोबर, २०२६.
४) शासन शुद्धिपत्रक, मदत व पुनर्वसन विभाग, क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४ ऑक्टोबर, २०२६.

प्रस्तावना :-

मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथे नमूद दि. २५ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये खरीप २०२६ हंगामासाठी Trigger-१ (प्रथम कळ) लागू करून विविध सवलती व उपाययोजना घोषित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार या विभागाच्या संदर्भ क्र. २ येथे नमूद दि.०९ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, दुष्काळग्रस्त भागातील शेतीवर आश्रित शेतकरी, शेतमजूर इत्यादी घटकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, याकरिता प्रभावी व्यवस्था उभी करण्याचे अनुषंगाने दुष्काळी तालुक्यांशी संबंधित सर्व जिल्ह्यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापि, मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भ क्र.३ व ४ येथील दि. १४ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील जून ते ऑक्टोबर- २०२६ या कालावधीत पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये खरीप २०२६ हंगामासाठी Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) लागू करून विविध सवलती व उपाययोजना घोषित करण्यात आलेल्या आहेत. या ३०४ दुष्काळी तालुक्यांतील शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्य वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत गरजू लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित करण्यात येते. यास्तव, संदर्भ क्र.३ व ४ येथे नमूद दि.१४

ऑक्टोबर, २०२६ च्या शासन निर्णयानुसार, राज्यातील दुष्काळ जाहिर झालेल्या जिल्ह्यांतील ३०४ तालुक्यांना, या विभागाच्या दि.०९.१०.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना लागू करण्यात येत आहेत. संबंधित सर्व ३०४ तालुका व जिल्हा प्रशासनाने सदर मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२२१६५५४८२५०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.10.22 16:57:29 +05'30'

**( संतोष गायकवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्रालयीन विभाग.
८. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१२. सर्व उपायुक्त (पुरवठा).
१३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
१४. सर्व तहसीलदार.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी).
१६. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).